# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 07/07/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

### विनयभंग

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– फिर्यादी/पीडित वय 28 वर्ष व आरोपी नामे– विकास रामअवतार साहू, वय 23 वर्ष, रा गांगापूर झोपडपट्टी टाकळघाट, त. हिंगणा जि. नागपूर हे आमोरासमोर झोपडपट्टीत राहतात. अंदाजे 15 दिवसापूर्वी यातील आरोपी याचा मोबाईल हरविला होता व त्याचा संशय आरोपीने फिर्यादीवर घेतला होता या कारणावरून दिनांक 07/07/2021 चे 12.00 वा. ते 12.30 वा. दरम्यान फिर्यादी ही छपरीत खाटेवर झोपली असता आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने तिला हातबुक्कीने मारहाण केली वादामध्ये तिचे मंगळसूत्र काळया मनीची पोत तुटून कुठेतरी पडली व हातापाईमध्ये तिला ओठाला मार लागला व आरोपीने जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354 452, 323, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ बन्सोड मो नं. 9673608642 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. काटोल – दिनांक 06/07/2021 चे 22.00 वा. ते दिनांक 07/07/2021 चे 05.00 वा. चे सुमारास पो. स्टे. काटोल हद्दीत फिर्यादीयांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हाण 9545363121 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर